**R.P.A.D.**

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/रापानों २०१६/प्र.क्र.२४/का.११
नवीन प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक -३०.०३.२०२२

प्रति,
श्री. बळीराम चोपणे,
अध्यक्ष : डॉ. सौ.विमलताई मुंदडा विकास आघाडी,
गंगा निवास शिवाजी नगर, रिंग रोड, अंबाजोगाई,
जि.बीड ४३१५१७ (महाराष्ट्र राज्य).

विषय :- राजकीय पक्षाच्या नावातील बदलास मंजूरी देण्याबाबत.
संदर्भ:-१.आपला दि.२७/१२/२०२१ रोजीचा प्रस्ताव
२.आयोगाची रानिआ/रापनों२०१६/प्र.क्र.२४/का.११,दि.१७/०२/२०२२
ची शासन राजपत्रात प्रसिद्ध झालेली अधिसूचना

महोदय,

राजकीय पक्षाची नोंदणी आदेश,२००९ दि.३१ मार्च,२००९ भाग दोन (९) (दोन) मधील तरतुदीनुसार डॉ.सौ.विमलाताई मुंदडा विकास आघाडी या पक्षाची नोंदणी आयोगाच्या पत्र क्र.रानिआ/रापनों-०१६/प्र.क्र.२४/का.११,दि.१५ ऑक्टोंबर,२०१६ अन्वये करण्यात आली होती. आपण पत्र दि.२७ डिसेंबर,२०२१ अन्वये डॉ.सौ.विमलाताई मुंदडा विकास आघाडी या पक्षाच्या नावात बदल करून त्या ऐवजी पक्षाचे नाव अंबाजोगाई शहर परिवर्तन जनविकास आघाडी असे बदलून त्याची नोंदणी आयोगाकडे करण्याबाबत विनंती केली आहे.

याअनुषंगाने पक्षाच्या नावात बदल करण्याबाबत राजकीय पक्ष नोंदणी आदेश,२००९ दि.३१ मार्च,२००९ व दि.१५ फेब्रुवारी, २०२२ च्या आदेशांनुसार उक्त संदर्भ क्र.२ अन्वये अधिसूचना दि.१७/०२/२०२२ रोजी प्रसिध्द करून पक्षाच्या नाव बदलाबाबत सर्वसाधारण जनतेकडून हरकती मागविण्यात आल्या होत्या.तथापि विहित मुदतीत हरकती प्राप्त न झाल्याने,आयोगाच्या उक्त आदेशांतील भाग दोन ३.(१०) (अ) च्या सुधारित तरतुदीनुसार "डॉ.सौ.विमलाताई मुंदडा विकास आघाडी" या पक्षाचे नावात "अंबाजोगाई शहर परिवर्तन जनविकास आघाडी" असे बदल करण्यात राज्य निवडणूक आयोगाची मान्यता देण्यात येत आहे.

आदेशानुसार,

आपला,
(अविनाश संणस)
उपायुक्त
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र.

प्रत:-१.विभागीय आयुक्त, सर्व विभागीय आयुक्तालय,
२.महानगरपालिका आयुक्त, सर्व महानगरपालिका कार्यालय,
३.जिल्हाधिकारी,सर्व जिल्हाधिकारी कार्यालय (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)

४.मुख्य कार्यकारी अधिकारी,सर्व जिल्हा परिषद कार्यालय,
५.मुख्याधिकारी,नगरपरिषदा/नगरपंचायती,सर्व नगरपरिषदा/नगरपंचायती कार्यालय,
६.राज्य निवडणूक आयेगातील सर्व अधिकारी,
७.निवड नस्ती